अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ५२८९
दिनांक : १६/०९/२०२१

-: आदेश :-

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
पी.एम.पी.एम.एल. कडील कर्मचाऱ्यांची कोरोना कामकाजासाठी केलेली नेमणूक रद्द करणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/८४३९, दि.२४.०२.२०२१.
५) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/८५१६, दि.२६.०२.२०२१.
६) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२६१, दि.१०.०४.२०२१.
७) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/६२४, दि.२६.०४.२०२१.
८) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/११७३, दि.११.०५.२०२१.
९) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/३०५६, दि.०७.०७.२०२१.
१०) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडील जा.क्र. १५६४, दि. १३.०९.२०२१

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी कोरोनाविषयक कामकाज सुरु करण्यात आले होते.

त्यानुसार संदर्भ क्र. ४ ते ९ अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड कडील सेवकांच्या सेवा आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक कामकाजाकरिता वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांनी केलेल्या मागणीनुसार उपरोक्त संदर्भ क्र. ४ ते ९ अन्वये पी.एम.पी.एम.एल. कडील उपलब्ध करून दिलेल्या सेवकांपैकी सोबत जोडलेल्या यादीतील विमानतळ, लोहगाव, पुणे व डॉ.नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय येथे कामकाज करीत असलेल्या सेवकांना वगळून उर्वरित सेवकांना पुणे महानगरपालिकेकडून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

सदर कर्मचाऱ्यांनी आदेशाच्या दिनांकापासून पी.एम.पी.एम.एल. कडे रुजू व्हावे. सदर कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केल्याचा अहवाल संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे त्वरित पाठवावा.

Raut
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
16/9/2021

प्रत -
१) मा.व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड
२) मा. अतिरिक्त आयुक्त (ज/इ/वि) यांना माहितीस्तव.
३) संबंधीत खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका.